VCD/ 7/5/2022 / FYBAMMC (Marathi)/ Sem II/ Content Writing/2.45Hrs./ 75 Marks

सूचना - सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
उजवीकडील अंक प्रश्नाचे गुण दर्शवतात.

प्र 1) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. (४०)

१. आशय लेखक म्हणून सोशल मीडियावर आशय लिहिणे याचा अर्थ......
(अ) सोशल मीडियावर लेखन करणे म्हणजे कॅप्शन्स लिहिणे (ब) सोशल मीडियावर काहीही लिहिणे म्हणजे सोशल मीडियावर आशय लिहिणे (क) सोशल मीडियाच्या माध्यमातून आशय लेखन करून वाचकांपर्यंत पोहोचणे (ड) सोशल मीडिया आशय लेखन हे योग्य प्रेक्षकांना लक्ष्य करण्यासाठी आहे, एकूण संदेश आपल्या भाषेत लिहिला गेला पाहिजे आणि तो सोपा असावा आणि त्याने प्रेक्षकांशी योग्य संवाद साधला पाहिजे.

२. ऑनलाईन आशय लेखनासाठी कोणती शैली योग्य असते?
(अ) फॉर्मल शैली (ब) संवादात्मक शैली (क) फॉर्मल आणि संवादात्मक शैलीचे मिश्रण (ड) लक्ष्य ग्राहकावर अवलंबून

३. पु. ल. देशपांडे यांच्या लेखनातील काही ओळी त्यांच्या नावाचा उल्लेख न करता वापरल्या गेल्या तर त्याला काय म्हणतात?
(अ) कॉपीराईटचे उल्लंघन (ब) साहित्यिक चोरी (क) चोरी (ड) वाङ्मय चौर्य

४. सर्च इंजिनसाठी आशय ऑप्टिमाइझ करताना खालीलपैकी काय महत्वाचे असते?
(अ) तुमचा ब्लॉग नियमितपणे अपडेट करणे (ब) तुमचे यूआरएल सोपे असेल (क) कीवर्डस्, टॅग, मेटाटॅग्ज् यांचा समावेश, उत्तम आशय आणि नियमित अपडेट करणे (ड) उत्तम आशय

५. ब्लॉग आणि वेबसाईट यात कशामुळे फरक पडतो?
(अ) अपडेट केलेल्या टाइमलाइननुसार पोस्ट करणे जेणेकरुन जुन्या पोस्ट शोधल्या जाऊ शकतात (ब) अधिक आशय (क) चमकदार छायाचित्रे (ड) अधिक व्यावसायिक आशय

६. ब्लॉग म्हणजे काय?
(अ) वेब बिग (ब) वेब लॉग (क) बिग लॉग (ड) रीड वेब

७. ज्याचे ब्लॉग असतात अशा व्यक्तीला काय म्हणतात?
(अ) ब्राऊझर (ब) ब्लॉगिंग (क) ब्लॉगर (ड) व्लॉगर

८. सामान्यत: ब्लॉगच्या मुख्यपृष्ठावर दिसणाऱ्या मूलभूत ब्लॉग नोंदींना काय म्हणतात?
(अ) पृष्ठे (ब) श्रेणी (क) विजेट्स (ड) पोस्ट

९. युआरएल म्हणजे काय?
(अ) युनिकॉर्न रेस्ट लेझिली (ब) अंब्रेला रिड्स लॉट्स (क) युनिफॉर्म रिसोर्स लोकेटर (ड) अंडरनीट रिमेनिंग लॉग्ज्

१०. माळ या शब्दाचा योग्य अर्थ काय?

munotes.in

(अ) ओसाड जागा (ब) वेळ (क) मन (ड) काव्यरचनेचा एक प्रकार

११. नाक मुरडणे याचा अर्थ काय?
(अ) नाईलाज होणे (ब) माघार घेणे (क) नापसंती दाखवणे (ड) सर्वनाश होणे

१२. अतिशय भयभीत होणे यासाठी खालीलपैकी कोणता वाक्प्रचार योग्य आहे?
(अ) न भूतो न भविष्यती (ब) विनाशकाले विपरीत बुद्धी (क) पाचावर धारणा बसणे
(ड) मिरच्या झोंबणे

१३. दरवर्षी नवीन प्राणी ---, मी निसर्गाशी बांधिलकी --- असतो. या वाक्यात एकच योग्य शब्द कोणता असेल?
(अ) माळत (ब) गाळत (क) पाळत (ड) साळत

१४. आर अ‍ॅण्ड डी या शब्दाचे विस्तारित रुप कोणते?
(अ) रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट (ब) रिसर्च अ‍ॅडव्हान्स डेव्हलपमेंट (क) रिक्रूट अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट
(ड) रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलप्ड

१५. आरबीआय हे कोणत्या शब्दाचे संक्षिप्त रूप आहे?
(अ) रिझर्व्ह बॅंक ऑफ इंपोर्ट (ब) रिजनल बॅंग ऑफ इंडिया (क) रिझर्व्ह बुक ऑफ इंडिया
(ड) रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया

१६. बी2बी याचे विस्तारित रूप कोणते?
(अ) ब्रेन टू बिजनेस (ब) बिजनेस टू बिजनेस (क) बिजनेस टू बोर्ड (ड) बिजनेस टू बेस्ट

१७. सॉफ्ट न्यूज म्हणजे काय?
(अ) बातमी जी मतांवर आधारित असते, तथ्यांवर नाही (ब) बातमी जी मनोरंजन करते किंवा लक्षवेधी असते (क) बातमी जी पेपर न छापता, इंटरनेटवर प्रसिद्ध होते (ड) उपदेश करणारा कॉलम

१८. हार्ड न्यूज म्हणजे काय?
(अ) समजण्यास कठीण विषयांचा समावेश असलेल्या बातम्या (ब) मतांवर आधारित बातम्या, तथ्यांवर आधारित नाहोत (क) लोकांच्या संपूर्ण गटाला प्रभावित करणारी बातमी (ड) फक्त एक प्रकारची बातमी

१९. पुढीलपैकी कोणत्या वर्षी फेसबुकची सुरुवात झाली?
(अ) 2005 (ब) 2001 (क) 2004 (ड) 2009

२०. आरोग्य मंत्रालयाच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध झालेल्या माहितीपूर्ण व्हिडिओ मालिकेचे नाव काय आहे?
(अ) कोविड वॉरिअर (ब) कोविड गुरुकुल (क) कोविड द्रोण (ड) कोविड अस्त्र

प्र 2) अ) खालील विषयांवर स्नीपेट तयार करा. (०७)
१. श्रीदेवीच्या मुली जान्हवी आणि खुशी यांचे मोठा भाऊ अर्जुन कपूरबरोबर असणारे नातेबंध
२. माझी झटपट आणि त्वचेची सोपी काळजी घेण्याची दिनचर्या

munotes.in

ब) सोशल मीडिया नेटवर्किंग साइट्सबद्दल सविस्तर माहिती लिहा. (०८)

किंवा

क) खालील बातम्यांसाठी योग्य शीर्षक लिहा (१५)

१. ब्रिटनमध्ये कोरोना विषाणूने प्रभावित झालेल्यांची वाढती संख्या लक्षात घेता प्रीमियर लीगने स्पष्ट केले आहे की सामन्यापूर्वी कोणत्याही प्रकारे हस्तांदोलन होणार नाही. वरिष्ठ पातळीवरून आलेल्या वैद्यकीय सल्ल्यानुसार इंग्लंडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे स्पष्ट केले आहे की, या आठवड्याच्या शेवटी सुरू होणाऱ्या सामन्यांमध्ये दोन्ही संघांचे खेळाडू आणि त्यांचे अधिकारी यांच्यात कोणत्याही परिस्थितीत हस्तांदोलन होणार नाही.

२. ईशान्य दिल्लीत उसळलेल्या जातीय हिंसाचारानंतर एका आठवड्याने सुरक्षा दलांच्या कडेकोट बंदोबस्तात सरकारी मदत आणि पुनर्वसन योजना सुरू झाल्याने जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येऊ लागले आहे. पोलिसांनी जाफराबाद, मौजपूर, बाबरपूर, चांदबाग येथे ध्वज संचलन केले आणि स्थानिकांबरोबर बैठक घेतली...

३. पोलीस अपयशी ठरले तर लोकशाही अपयशी ठरते असे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी सांगितले. लोकशाहीमध्ये कायदा बनवणे ही सर्वात पवित्र गोष्ट आहे. हे लोकप्रतिनिधींनी केले आहे. आपण कायद्याची अंमलबजावणी करणारे आहात आणि जर तुम्ही अपयशी ठरला तर लोकशाही अपयशी ठरते, असे गुडगाव येथे आयोजित युवा पोलीस अधीक्षकांच्या दोन दिवसीय परिषदेत डोवल म्हणाले.

प्र 3) अ) गुगल ॲडव्हान्स सर्च म्हणजे काय? सविस्तर लिहा. (०८)
ब) 'आशय राजा असतो' असे का म्हटले जाते? (०७)

किंवा

क) हेडलाईन म्हणजे काय ते सांगून हेडलाईन लेखनात कोणकोणत्या पायऱ्यांचा समावेश होतो ते सविस्तर लिहा. (१५)

प्र ४) टिपा लिहा (कोणतीही एक). (०५)
अ. चांगल्या हेडलाईनची वैशिष्ट्ये
ब. स्नीपेट्स
क. वाक्प्रचार आणि म्हणी
ड. बातमीचा टीकर

munotes.in